| MHBI160004672016 | दाखल दिनांक | : | १५.०३.२०१६ |
|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : | २३.०३.२०१६ |
| | निकाल दिनांक | : | ०३.०७.२०२६ |
| | कालावधी | | वर्षे महिने दिवस<br>१० ०३ ११ |

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, शिरुर कासार, जि.बीड यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी : अक्षय सं. जगताप)**

(न्यायनिर्णय : दिनांक ०३ जुलै २०२६)

**नि.फौ.ख.क्र.४१/२०१६**

**निशाणी क्र.५०/ब.**

प्रथम खबर अहवाल तपशील
गुन्हा नोंद क्र. : ११९/२०१५
पोलीस ठाणे : शिरुर कासार, जि.बीड.

| | |
|---|---|
| **फिर्यादी** | **महाराष्ट्र शासन**<br>मार्फत–पोलीस ठाणे शिरुर कासार,<br>जि.बीड. |
| सरकारी अभियोक्ता | श्री. डी. एम. पाटील |
| **आरोपी** | **बाबु उर्फ आप्पासाहेब काशिनाथ नागरगोजे**<br>वय : २७ वर्षे,<br>रा. खांबालिंबा, ता. शिरुर कासार, जि. बीड |
| आरोपीचे विधीज्ञ | श्री. बी. बी. जायभाये |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १५.१०.२०१५ |
| प्रथम खबर अहवाल | १५.१०.२०१५ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | १५.०३.२०१६ |
| दोषारोप निश्चीती दिनांक | २६.०९.२०१९ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २६.०९.२०१९ |
| निकाल राखुन ठेवल्याचा दिनांक | ०३.०७.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | ०३.०७.२०२६ |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामीनवर मुक्त झाल्याचा दिनांक | दोषारोपाचे कलम | आरोपीस शिक्षा किंवा निर्दोष मुक्त केले. | शिक्षा | **Period of detention undergone during trial.** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **बाबु ऊर्फ आप्पासाहेब काशिनाथ नागरगोजे** | नोटीसीवर सोडण्यात आले | -- | भादंवि चे ४५२, ३२३, ५०४, ५०६ अन्वये | निर्दोष मुक्त केले | -- | -- |

### अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार

| अ.सा. | साक्षीदारांची नांवे | निशाणी क्र. | साक्षी प्रकार |
|---|---|---|---|
| १. | भास्कर साहेबराव विघ्ने | ३० | जप्ती पंच |
| २. | गोकुळ बाजीराव बांगर | ३२ | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| ३. | मंजुळा भागवत बांगर | ३४ | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| ४. | अश्वीनी भागवत बांगर | ३५ | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| ५. | आतिष प्रल्हाद बांगर | ३६ | घटनास्थळ पंच |
| ६. | हनुमंत मुरलीधर बांगर | ३८ | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| ७. | अशोक बापुराव शेळके | ३९ | तपासी अंमलदार |

### आरोपी तर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार

| अ.सा. | साक्षीदारांची नांवे | साक्षी प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

### न्यायालया मार्फत तपासण्यात आलेले साक्षीदार

| अ.सा. | साक्षीदारांची नांवे | साक्षी प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

### अभियोग पक्षातर्फे देण्यात आलेल्या निशाणी

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| १. | ३७ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | ४० | जप्ती पंचनामा |

### मान्य केलेली कागदपत्र

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| – | – | – |

### आरोपी तर्फे देण्यात आलेल्या निशाणी

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| – | – | – |

### न्यायालया तर्फे देण्यात आलेले निशाणी

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| – | – | – |

### मुद्देमालचा तपशील

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | मुद्देमालाचा प्रकार |
|---|---|---|
| १. | एम.आर.क्र.७८/२०१५ | बजाज डिसकव्हर कंपनीची मोटार सायकल क्रमांक एम.एच.२३ए.जी.५३३२ |

:: **<u>न्या य नि र्ण य</u>** ::

(दिनांक ०३ जुलै २०२६ रोजी घोषीत)

आरोपी विरुध्द भारतीय दंड संहिता कलम ४५२, ३२३, ५०४, ५०६ अन्वये खटला चालविण्यात आला.

### अभियोग पक्षाचे कथन

२) दिनांक १५/१०/२०१५ रोजी फिर्यादी भागवत रामभाऊ बांगर याने पोलीस स्टेशन, शिरुर कासार येथे तोंडी फिर्याद दिली की, दिनांक १५/१०/२०१५ रोजी सायंकाळी ०६.०० वाजेच्या सुमारास मौजे आनंदगाव, ता. शिरुर कासार येथे फिर्यादी हा त्याची पत्नी व मुलगी यांचेसह त्याचे घरी असताना आरोपी हा त्याचेकडे असलेल्या मोटार सायकल क्रमांक एम.एच.२३–ए.जी.–५३३२ वर त्याचे घरासमोर

आला. आरोपीने त्याची मोटार सायकल फिर्यादीच्या घरासमोर उभी करुन फिर्यादीच्या घरात घुसला व फिर्यादीच्या मुलासोबत झालेल्या भांडणाची कुरापत काढुन शिवीगाळ करु लागला. तेव्हा फिर्यादीने आरोपीस 'तु शिव्या देवु नकोस, माझा मुलगा घरी नाही' असे म्हणताच आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करुन चापटा बुक्क्यांनी मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली. तेव्हा फिर्यादीची पत्नी भांडण सोडवण्यासा आली असता आरोपीने तिला धक्काबुक्की केली. त्यावेळी फिर्यादीने आरडा ओरडा केल्याने गावातील गोकुळ बांगर, हनुमंत बांगर, सचिन फुंदे हे पळत आल्याने आरोपी हा त्याची मोटार सायकल तेथेच सोडुन पळुन गेला.

३) फिर्यादीच्या सदरच्या तोंडी तक्रारीवरुन पोलीस ठाणे अंमलदार, शिरुर कासार पोलीस ठाणे यांनी उपरोक्त आरोपी विरुध्द गु.र.नं.११९/२०१५ भारतीय दंड संहिता कलम ४५२, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये नोंदविला व सदर प्रकरणाचे तपासकाम ए. बी. शेळके, पो.हे.कॉ. ब.न. १०८५ यांच्याकडे सोपविण्यात आले. तपासादरम्यान तपासी अंमलदार यांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला, साक्षीदारांचे जाब जबाब नोंदविले, वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले, आरोपीला नोटीस दिली व तपासाअंती आरोपी विरुध्द ठोस पुरावा आलेने भारतीय दंड संहिता कलम ४५२, ३२३, ५०४, ५०६ अन्वये दोषारोपत्र न्यायप्रविष्ठ केले.

## दोषारोप व आरोपीचे म्हणणे

४) तत्कालीन न्यायिक अधिकारी यांनी दोषारोपपत्र व दस्तऐवजांचे अवलोकन करुन निशाणी १४ कडे आरोपी विरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ४५२, ३२३, ५०४, ५०६ अन्वयेचा दोषारोप निश्चित केला. आरोपीस दोषारोप त्याच्या भाषेत वाचुन व समजावुन सांगितला. आरोपीने दोषारोप नाकारुन संपरिक्षा करण्याची

विनंती केली.

५) अभियोगपक्षाच्या पुराव्याअंती आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वयेचे निवेदन निशाणी ४४ वर नोंदविण्यात आले आहेत. आरोपीचा बचाव हा संपुर्णतः नकारार्थी स्वरुपाचा आहे.

**मुद्दे व निष्कर्ष**

६) सरकारपक्षा तर्फे विद्वान विधिज्ञ डी. एम. पाटील यांचा युक्तीवाद ऐकला. आरोपी तर्फे विद्वान विधिज्ञ बी. बी. जायभाये यांचा युक्तीवाद ऐकला. साक्षीपुरावे व संचीकेचे अवलोकन केले. उभयपक्षाचा युक्तीवाद व प्रकरणाचे स्वरुप पाहता खालील मुद्दे विचाराधीन येतात. सदर मुद्द्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नोंदविण्यात आले आहेत.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | दिनांक १५/१०/२०१५ रोजी सायंकाळी ०६.०० वाजताच्या दरम्यान मौजे आनंदगाव, ता. शिरुर कासार येथे आरोपीने फिर्यादीचे घरात बेकायदेशिररित्या फिर्यादीस ईजा पोहोचवण्याच्या दृष्टीने प्रवेश करुन गृहअतिक्रमण केले ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली आहे काय ? | नाही. |
| २) | वर नमूद केलेली तारीख, वेळ व ठिकाणावर आरोपीने फिर्यादीस मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत पोहचविली ही बाब अभियोगपक्षाने शाबित केली आहे काय ? | नाही. |
| ३) | वर नमूद केलेली तारीख, वेळ व ठिकाणावर आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करुन सार्वजनिक शांतता भंग घडवुन आणण्यास उद्युक्त केले ही बाब अभियोजन पक्षाने शाबित केली आहे काय? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| ४) | वर नमूद केलेली तारीख, वेळ व ठिकाणावर आरोपीने फिर्यादीस धमकी देवून त्यांच्यावर फौजदारीपात्र धाकदपटशा केल्याची बाब अभियोजन पक्षाने शाबित केली आहे काय ? | नाही. |
| ५) | अंतीम आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## का र ण मि मां सा

७) अभियोग पक्षाने आरोपी विरुध्द गुन्हा सिध्द करण्याच्या संबंधाने वर नमुद केल्याप्रमाणे एकुण ०७ साक्षीदार तपासले आहेत. तर प्रस्तुतील प्रकरणातील फिर्यादी हा मयत झाल्याबाबतचे मृत्युप्रमाणपत्राची प्रत अभिलेखावर दाखल करण्यात आली आहे. अभियोगपक्षाला उर्वरीत साक्षीदारांची साक्ष तपासण्याची वारंवार संधी देण्यात आली. परंतु अभियोगपक्ष सदरील साक्षीदारांना साक्षीकामी हजर ठेवु शकला नाही. त्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा निशाणी १ वर आदेश पारित करुन बंद करण्यात आला. उलटपक्षी आरोपी तर्फे त्याचे बचावात कोणताही तोंडी अथवा लेखी पुरावा सादर करण्यात आलेला नाही.

**मुद्दा क्र. १ ते ४ करिता** –

८) मुद्दा क्र. १ ते ४ हे एकाच घटनेशी निगडीत असल्यामुळे त्यांचे विवेचन एकत्रीत करण्यात येते.

९) अभियोगपक्षाने आरोपी विरुध्द ठेवलेले भारतीय दंड संहिता कलम

४५२, ३२३, ५०४, ५०६ अन्वयेचे दोषारोप शाबीत करण्या करीता आरोपीने फिर्यादीचे घरात बेकायदेशिररित्या प्रवेश करुन फिर्यादीस शिवीगाळ करुन चापटा बुक्क्यांनी मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली या बाबी शाबीत करणे गरजेचे आहे. अभियोगपक्षाने आरोपी विरुध्द ठेवलेले दोषारोप शाबीत केले किंवा नाही हे पाहणे करीता अभियोगपक्षा तर्फे आलेल्या तोंडी व लेखी पुराव्याचे सुक्ष्मपणे अवलोकन करणे गरजेचे आहे.

१०) प्रस्तुत प्रकरणातील साक्षीदार क्र.३ मंजुळा ही फिर्यादीची पत्नी असुन साक्षीदार क्र.४ अश्वीनी ही फिर्यादीची मुलगी आहे. साक्षीदार क्र.३ व ४ हे घटनेतील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत. साक्षीदार क्र.३ व ४ यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, घटना ही अंदाजे १० वर्षापूर्वी सायंकाळी ०५.०० वाजता त्यांच्या घरात घडली होती. घटने वेळी फिर्यादी व साक्षीदार क्र.३ व ४ हे घरात असताना आरोपी हा मोटार सायकल घेवुन त्यांच्या घरी आला व त्याने मोटार सायकल घरासमोर लावुन त्यांच्या घरात आला व फिर्यादीस 'तुझ्या मुलाने माझ्यासोबत भांडण का केले' असे म्हणुन भांडण सुरु केले. आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करुन लाथाबुक्क्याने हाणमार केली. त्यामुळे साक्षीदार क्र.३, ४ व आजुबाजुचे लोक म्हणजेच साक्षीदार क्र.२ गोकुळ, साक्षीदार क्र.६ हनुमंत व सचिन फुंदे यांनी भांडण सोडविले आणि त्यानंतर आरोपी फिर्यादीच्या घरुन निघुन गेला.

११) आरोपी तर्फे साक्षीदार क्र. ३ व ४ यांचा उलटतपास नोंदविण्यात आला. साक्षीदार क्र.३ व ४ यांनी त्यांचे उलटतपासणीत आरोपींच्या बहुतांश प्रश्नांना नकारात्मक उत्तरे दिली आहेत. साक्षीदार क्र.३ व ४ यांचे उलटतपासणी दरम्यान आरोपीने असा

बचाव घेतला आहे की, आरोपीकडे मोटार सायकल नसल्याचे व त्यास मोटार सायकल चालवता येत नाही. परंतु, सदरचा बचाव साक्षीदार क्र.३ व साक्षीदार क्र. ४ यांनी नाकारला आहे.

१२) अभियोगपक्षा मार्फत तपासण्यात आलेले साक्षीदार क्र. ५ आतिष प्रल्हाद बांगर हा प्रस्तुत प्रकरणातील पंच साक्षीदार असुन त्याने त्याच्या साक्षीत दिनांक १६/१०/२०१५ रोजी पोलीसांनी त्याच्या समक्ष फिर्यादीच्या घरी निशाणी ३७ अन्वये पंचनामा तयार केल्याचे कथन केले आहे. साक्षीदार क्र.५ ने त्याचे पुराव्यात घटनास्थळ पंचनामा शाबीत केला आहे.

१३) अभियोगपक्षा मार्फत तपासण्यात आलेले साक्षीदार क्र. ७ अशोक बापुराव शेळके हे प्रस्तुत प्रकरणातील तपासी अंमलदार असुन सदर साक्षीदाराचा पुरावा तपासाच्या अनुषंगे आहे. साक्षीदार क्र.७ ने त्याच्या पुराव्यात त्याने निशाणी ३७ अन्वये घटनास्थळ पंचनामा व निशाणी ४० अन्वये जप्ती पंचनामा केल्याचे, साक्षीदाराचे तपास टिप्पण नोंदविल्याचे व तपासाअंती आरोपी विरुध्द पुरावा आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केल्याचे कथन केले आहे.

१४) अभियोगपक्षा तर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार क्र.१ हा जप्ती पंच साक्षीदार असुन साक्षीदार क्र.२ व ६ हे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत. साक्षीदार क्र. १, २ व ६ यांनी त्यांचे पुराव्यात अभियोगपक्षास सहाय्य केले नसुन त्यांनी पुराव्यात आरोपी विरूध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपास अनुसरुन कोणतेही कथन केले नाही. साक्षीदार क्र.२ व ६ यांचे न्यायालया समोरील पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, आरोपी व फिर्यादी मध्ये काय काय घटना घडली होती हे त्यांना माहित नसल्याचे व

पोलीसांनी त्यांच्याकडे चौकशी करुन जबाब नोंदविला नसल्याचे कथन केले आहे. सदर साक्षीदार क्र.१, २ व ६ यांनी आरोपी विरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपास अनुसरुन कथन केले नाही.

१५) साक्षीदार क्र. १, २ व ६ हे अभियोगपक्षास सहाय्य करीत नसल्यामुळे अभियोगपक्षाने त्यांना न्यायालयाचे परवानगीने उत्तरसुचक प्रश्न विचारले. परंतु, अभियोगपक्षास सहाय्यक असे पटलावर काहीही आले नाही. साक्षीदार क्र.१, २ व ६ यांनी त्यांच्या पुराव्यात आरोपी विरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपास अनुसरुन कोणतेही कथन केले नाही.

१६) अभियोगपक्षाने आरोपी विरुध्द ठेवण्यात आलेले दोषारोप शाबीती करिता तपासण्यात आलेले साक्षीदार क्र.१ ते ७ यांचे पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी हा मयत आहे. त्यामुळे अभियोगपक्षाने फिर्यादीची साक्ष नोंदविलेली नाही. अशा परिस्थितीत अभियोगपक्षा मार्फत फिर्यादी जबाब नोंदवुन घेणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्याची साक्ष नोंदविली नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणातील महत्वाचा पुरावा म्हणजे फिर्यादी जबाब शाबीत झालेला नाही.

१७) साक्षीदार क्र.३ व ४ यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता वर नमुद केल्याप्रमाणे साक्षीदार क्र.३ ही फिर्यादीची पत्नी असुन साक्षीदार क्र.४ ही फिर्यादीची मुलगी आहे. साक्षीदार क्र.३ व ४ यांनी त्यांच्या पुराव्यात घटने वेळी ते प्रत्यक्ष हजर असताना आरोपी हा त्यांच्या घरी आला व फिर्यादीस शिवीगाळ करुन हाणमार करु लागला व त्यावेळी साक्षीदार क्र.२, ६ व सचिन फुंदे यांनी भांडण सोडविल्याचे कथन केले आहे. साक्षीदार क्र.३ व ४ यांच्या पुराव्यावरुन साक्षीदार क्र.२, ६ हे घटने वेळी

हजर असल्याचे दिसुन येते. करिता, साक्षीदार क्र.३ व ४ यांच्या पुराव्यासह साक्षीदार क्र.२ व ६ यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, साक्षीदार क्र.२ व ६ यांनी त्यांच्या पुराव्यात आरोपी विरुध्द ठेवलेल्या दोषारोपास अनुसरुन कोणतीही कथने केलेली नाहीत. सदर साक्षीदार क्र.२ व ६ यांनी त्यांच्या पुराव्यात घटने वेळी ते फिर्यादीच्या घरी गेल्याचे व फिर्यादी व आरोपी यांच्यातील वाद मिटवल्याचे कथन केले नाही. साक्षीदार क्र.२ व ६ यांनी त्यांच्या पुराव्यात अभियोगपक्षास सहाय्य न केल्याने त्यांना अभियोगपक्षाने न्यायालयाच्या परवानगीने उत्तरसुचक प्रश्न विचारले आहेत. परंतु, त्यानंतर देखील साक्षीदार क्र.२ व ६ यांनी दिनांक १५/१०/२०१६ रोजी आरोपीने फिर्यादीच्या घरात जावुन फिर्यादीस मारहाण केल्याचे व त्यांनी भांडण सोडवल्याचे बाब नाकारली आहे. त्यामुळे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार क्र.२ व ६ यांनी साक्षीदार क्र.३ व ४ यांच्या पुराव्यास पुष्टी दिलेली नसल्याचे दिसुन येते. परिणामी, साक्षीदार क्र.३ व ४ आणि साक्षीदार क्र.२ व ६ यांच्या पुराव्यात विरोधाभास दिसुन येतो. तसेच अभियोगपक्षाने प्रस्तुत प्रकरणात उपस्थित त्रयस्थ प्रत्यक्षदर्शी साक्षीदार सचिन फुंदे याची साक्ष नोंदविलेली नाही.

१८) प्रस्तुत प्रकरणातील तपासी अंमलदार व पंच साक्षीदार क्र.५ यांच्या पुराव्यावरुन घटनास्थळ व जप्ती पंचनामा शाबीत झाला आहे. जप्ती पंचनाम्याच्या अनुषंगाने साक्षीदार क्र.४ व तपासी अंमलदार यांचा तोंडी पुरावा आणि निशाणी ४० वरील जप्ती पंचनाम्याचे अवलोकन केले असता साक्षीदार क्र.४ ने तिच्या पुराव्यात आरोपीने फिर्यादीच्या घरासमोर लावलेली गाडी दुसऱ्या दिवशी पोलीसांनी घेवुन गेल्याचे कथन केले आहे. तसेच जप्ती पंचनाम्यात जप्त मोटार सायकल ही फिर्यादीकडुन जप्त केल्याचे नमुद करण्यात आले आहे. परंतु, तपासी अंमलदाराने त्याचे उलटपासा

दरम्यान जप्त मोटार सायकल हे वाहन आरोपीच्या ताब्यातुन जप्त केल्याचे कथन केले आहे. परिणामी, प्रस्तुत प्रकरणातील मोटार सायकल ही नेमकी कोणाच्या ताब्यातुन जप्त केली याबद्दल संशय निर्माण होतो.

१९) फौजदारी न्यायशास्त्रानुसार अभियोगपक्षाने आरोपी विरुध्द ठेवण्यात आलेले दोषारोप सर्व संशयापलीकडे जावुन शाबीत करणे गरजेचे आहे. सदर तत्वाच्या अनुषंगाने अभिलेखावर उपलब्ध पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार क्र.३ व ४ यांनी त्यांच्या पुराव्यात आरोपीने घटने वेळी त्यांच्या घरात येवुन शिवीगाळ करुन मारहाण केल्याचे कथन केले आहे. परंतु, प्रस्तुत प्रकरणातील स्वतंत्र व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार क्र.२ व ६ यांनी सदरची बाब नाकारली आहे व घटने दिवशी आरोपीने फिर्यादीच्या घरी येवुन फिर्यादीस मारहाण केल्याचे नाकारले आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांच्या पुराव्यात पुर्णत: विरोधाभास दिसुन येतो. अभियोगपक्षाने प्रस्तुत प्रकरणात महत्वाचा पुरावा म्हणजेच फिर्यादी जबाब शाबीत केलेला नाही. सदरची बाब देखील अभियोगपक्षाच्या एकंदरीत पुराव्यास मारक ठरते. प्रस्तुत प्रकरणात अभियोगपक्षाने आरोपी विरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपास अनुसरुन कथन करणाऱ्या एकाही स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांची साक्ष नोंदविलेली नाही. परिणामी, जरी साक्षीदार क्र.३ व ४ यांनी त्यांच्या पुराव्यात घटने दिवशी आरोपीने फिर्यादीच्या घरी येवुन फिर्यादीस शिवीगाळ करुन मारहाण केल्याचे कथन केले असले तरी वरील विवेचनावरुन अभियोगपक्षाच्या पुराव्यावर संशय निर्माण होतो आणि सदर संशयाचा फायदा आरोपी मिळण्यास पात्र आहे. परिणामी, अभियोगपक्ष हे आरोपी विरुध्द ठेवलेले ४५२, ३२३, ५०४, ५०६ अन्वयेचे दोषारोप शाबीत करण्यास अपयशी ठरले आहे. करीता, मी मुद्दा क्र. १ ते ४ चे उत्तर नकारार्थी नोंदविले आहे.

**<u>मुद्दा क्र. ५ बाबतः–</u>**

२०) मुद्दा क्र. १ ते ४ च्या निष्कर्षावरुन आरोपी विरुध्दचे दोषारोप शाबीत झालेले नाहीत. त्यामुळे आरोपी हा त्याचे विरुध्द ठेवलेल्या दोषारोपातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत.

२१) प्रस्तुत प्रकरणात बजाज डिसकव्हर कंपनीची मोटार सायकल क्रमांक एम.एच.२३ ए.जी.५३३२ जप्त करण्यात आली असुन त्यासंबधी आदेश करणे गरजेचे आहे. तसेच आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ ची पुर्तता यापुर्वीच केल्याने त्याअनुषंगे पुन्हा आदेश करणे गरजेचे नाही. सबब, मुद्दा क्र. ५ चे उत्तरा दाखल खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. आरोपीची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहिता कलम ४५२, ३२३, ५०४, ५०६ १४९ अन्वये पात्र असलेल्या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल बजाज डिसकव्हर कंपनीची मोटार सायकल क्रमांक एम.एच.२३ए.जी.५३३२ याचा अंतरिम ताबा कायम करण्यात येतो.

३. आरोपींचे स्वबंधपत्र रद्द करण्यात येते.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Digitally signed by AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Date: 2026.07.03 17:28:34 +0530

शिरूरकासार.
दिनांक ०३/०७/२०२६

**(अक्षय सं. जगताप)**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
शिरूर कासार.

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order".

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 03/07/2026 |
| Transcribed on | : | --------------- |
| Checked & signed on | : | 03/07/2026 |

SAGAR SOPANRAO AJABE

Digitally signed by SAGAR SOPANRAO AJABE
Date: 2026.07.03 17:35:07 +0530

**[Sagar S. Ajabe]**
Stenographer Grade-3